# सूक्ष्म (माइक्रो) आणि लघु उद्योगा साठी बँकेच्या बांधिलकीची संहिता,

ऑगस्ट २०१५

भारतीय बँकिंग संहिता आणि मापदंड मंडळ

www.bcsbi.org.in

# <u>सूक्ष्म (माइक्रो) आणि लघु उद्योगा साठी बँकेच्या बांधिलकीची संहिता, 2015</u>

सदर संहिता बँकेच्या सूक्ष्म (माइक्रो) आणि लघु उद्योगाचे ग्राहक व त्यांचे दैनिक व्यवहार आणि आर्थिक संकटात सहज, विनाविलंब आणि पारदर्शक बँकिंग सेवा देण्यासाठी बँकेची सकारात्मक बांधिलकी दर्शविते. ही संहिता सूक्ष्म आणि लघु उद्योगांचे फक्त अधिकार पत्रक नसुन, त्यांना बँकेच्या तुलनेत त्यांच्या कर्तव्यांना ही समाविष्ट केलेले आहे. **ग्राहकांप्रति बँकेच्या बांधिलकीच्या संहिते मधिल संबंधित तरतूदी सुक्ष्म आणि लघु उद्योगांचे ग्राहकांना पण लागु रहातील.**

**(टिप: मूळ इंग्रजी संहितेचे हे मराठी भाषांतर असून व्यावहारिक वापरासाठी मूळ इंग्रजी संहितेमदधे प्रतिबिंबित होणारा अर्थ ग्राह्य मानावा.)**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | | प्रस्तावना | 5 |
| | 1.1 | संहितेची उद्दिष्टे | 5 |
| | 1.2 | संहिताचा वापर | 6 |
| 2 | | मुख्य वचनबद्धता | 7 |
| | 2.1 | आपल्यासाठी आमच्या मुख्य वचने | 7 |
| | 2.1.1 | आपणासोबतचे सर्व व्यवहार आम्ही उत्तम, प्रामाणिकपणे करू. | 7 |
| | 2.1.2 | आमचे उत्पादन आणि सेवा कसे कार्य करतात हे आपणास समजूद देण्यात मदत करणे | 8 |
| | 2.1.3 | आपले खाते किंवा सेवा चा वापर करण्यासाठी आपणास मदत करणे. | 8 |
| | 2.1.4 | चुकीच्या गोष्टी झालेल्या वर उपाय म्हणुन जलद आणि सहानुभूतीने हाताळने. | 9 |
| | 2.1.5 | आपली सर्व वैयक्तिक आणि व्यवसायिक माहिती खाजगी व गोपनीय पद्धतीने सांभाळने. | 9 |
| | 2.1.6 | संहिताच्या प्रचारासाठी / जनतेपर्यंत पोचविण्यासाठी आम्ही हे करू. | 10 |
| | 2.1.7 | पक्षपातहीन धोरणाचा अवलंब आणि सराव करने | 10 |
| 3 | | माहिती – पारदर्शकता | 10 |
| | 3.1 | सामान्य माहिती | 11 |
| | 3.2 | व्याज दर | 11 |
| | 3.3 | प्रशुल्क अनुसूची | 12 |
| | 3.4 | अटी आणि शर्ती | 13 |
| 4 | | खाजगीपणा आणि गुप्तता | 14 |
| | 4.1 | कर्ज माहिती कंपन्या | 15 |
| 5 | | कर्ज | 16 |
| | 5.1 | अर्ज | 17 |
| | 5.2 | क्रेडिट (पत) मुल्यांकन | 18 |
| | 5.3 | मंजूरी / ना मंजूरी | 20 |

| | | | |
|---|---|---|---|
| | **5.4** | केंद्रीय नोंदणी | 21 |
| | **5.5** | वितरनापच्यात / कर्ज वितरणा नंतर | 22 |
| | **5.6** | नॉन-फंड आधारित सुविधा | 24 |
| | **5.7** | विमा | 24 |
| | **5.8** | आर्थिक अडचणी | 24 |
| | **5.9** | आजारी उद्योगांची काळजी आणि कर्ज पुनर्रचना आणि कर्ज पुनर्रचनेची काळजी घेणे | 26 |
| | **5.10** | एक वेळ / एक मूठी कर्ज परत फेड समझोता | 27 |
| | **5.11** | कर्ज आणि थकबाकीवर प्रतिभूतिकरण | 28 |
| **6** | | **देय राशि वसूली आणि गहाण मालमत्तेवर पुन: कब्जा करण्याचे धोरण** | **28** |
| | **6.1** | थकबाकी वसूल करने | 29 |
| | **6.2** | देय राशि वसूली करण्याचे धोरण आणि गहाण मालमत्ते वर पुन: कब्जा करने | 29 |
| *7* | | **अनुबंध : शब्दावली** | 32 |

# <u>सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी बँकेची बांधिलकी</u>

## <u>प्रस्तावना</u>

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम 2006 मध्ये व्याख्या केलेल्या सूक्ष्म व लघु उद्योगांशी व्यवहार करताना बँकांनी कमीत कमी कसा दर्जा राखावा या संदर्भातील सदर संहिता आहे. यामुळे तुम्हाला संरक्षण मिळते व बँकांनी तुमच्याशी नेहमीचे व्यवहार करताना आणि आर्थिक संकटाच्या काळात कसे वागले पाहिजे हेही कळते.

ही संहिता रिझर्व्ह बँकेच्या नियामक किंवा पर्यवेक्षक अनुदेश सूचनांच्या बदली किंवा ऐवजी दिलेली नाही आणि रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचा आम्ही पालन करू. नियामक सूचनांपेक्षा सर्वोच्च स्तर संहिताच्या तरतूदीमध्ये असेल व सर्वोच्च स्तर म्हणजे आमच्याद्वारे स्वीकारलेल्या सर्वोत्तम प्रथा असतील, हे आमचे तुम्हाला वचन आहे. संहितेमध्ये `तुम्ही' म्हणजे भारतातील सूक्ष्म व लघु उद्योग (सूक्ष्म आणि लघु उद्योग) व 'आम्ही' म्हणजे ज्यांच्याशी ग्राहक व्यवहार करत असेल ती बँक.

**1.1.** संहितेचे उद्दिष्टे

संहितेचे खालीलप्रमाणे उद्देश आहेत:

क. कार्यक्षम बँकिंग सुविधा उपलब्ध करुन देऊन सूक्ष्म व लघु उद्योग क्षेत्राला सकारात्मक ऊर्जा/वाव देणे.

ख. तुमच्याशी व्यवहार करताना बँकिंग प्रथाच्या दर्जाचा किमान स्तर निश्चित करुन उत्तम व योग्य सेवांचा पुरस्कार करने.

ग. पारदर्शिता वाढविणे ज्यामुळे बँकेच्या सेवेतून तुम्हाला काय अपेक्षित आहे, याबद्दल तुमची जाण वाढेल.

घ. प्रभावी संपर्काद्वारे तुमच्या उद्योगांबद्दलची आमची समज वाढवणे.

ङ. ड़. व्यवहाराचा एक उत्तम दर्जा गाठण्यासाठी स्पर्धात्मक मार्केटींग उत्तेजीत करणे.

च. तुम्ही व तुमची बँक यामध्ये योग्य व जिव्हाळ्याचे नाते निर्माण करणे.

छ. आपल्या बँकिंग गरजांचे आवश्यकतेनुसार वेळेवर व विनाविलंब सेवा सुनिश्चित करने.

ज. बँकिंग प्रणाली मध्ये विश्वास वाढविणे.

विभाग **2** मधिल मुख्य बांधिलकीने संकेत संहिताचा दर्जा राखला जाईल.

## 1.2. संहितेचा वापर

सूक्ष्म आणि लघु उद्योग विकास नियम, 2006 मध्ये व्याख्या केलेल्याप्रमाणे सूक्ष्म आणि लघु उद्योग (एमएसई) मध्ये वस्तुंचे उत्पादन किंवा निर्माण किंवा पुनर्निर्माण किंवा संरक्षणच्या कार्यात असतील अथवा याच्यांत सहकार्य उत्पन्न करणारे किंवा सहकार्य देणारे सुद्धा सूक्ष्म आणि लघु उद्योग श्रेणी मध्ये समाविष्ठ आहेत.

जोपर्यंत कुठे उल्लेख नसेल, खाली दिलेल्या सर्व उत्पादने व सेवांना हे संकेत लागू आहेत, जरी शाखा किंवा उपशाखा त्यांच्यातर्फे काम करणारे एजंट, काउंटरवरून, फोनवरुन, पोष्टाने, इलेक्ट्रॉनिक माध्यमाने, इंटरनेट किंवा इतर कोणत्याही पद्धतीने वापर केलेला असू दे, तथापि येथे उल्लेखिलेली सर्व उत्पादने आमच्यातर्फे देऊ केलेली असतील किंवा नसतील.

क. कर्ज व इतर क्रेडिट सुविधा ज्यामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल- कॅश क्रेडिट,

- **a.** ओव्हर ड्राफ्ट, चेक आणि बिल पर्चेस/डिस्काउंट (देशांतर्गत व विदेशी दोन्हीं), लेटर ऑफ क्रेडिट खाली दिलेल्या कागदपत्रांचे निगोशिएशन (देशांतर्गत व विदेशी दोन्हीं), आणि नॉन फंड बेस्ड जसे देशांतर्गत आणि/किंवा विदेशी लेटर ऑफ क्रेडिट (डी/पी किंवा डी/ए), हमी देणे (देशांतर्गत व विदेशी दोन्हीं), देशांतर्गत व विदेशी बिल्स किंवा कलेक्शनचे चेक, बिलचे को-ऍक्सेपटन्स किंवा एव्हलायजेशन, बायर्स क्रेडिट इत्यादि

ख. फेमा अंतर्गत परवानगी असलेल्या व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार

- **a.** विदेशी विनिमय सेवा.

ग. आमच्या शाखांद्वारे आणि/किंवा आमच्या अधिकृत प्रतिनिधी किंवा एजंट द्वारे विकली जाणारी त्रयस्थ पक्ष विमा व गुंतवणूक उत्पादने.

घ. **फॅक्टरींग सेवा**

ड. **मर्चंट सेवा (व्यापारी सेवा)**

वर दिली गेलेली ठळक अक्षरातील शब्दांचे अर्थ "शब्दार्थ" या विभागात दिले आहेत).

**2. मुख्य वचनबद्धता**

**2.1.** आपल्या साठी आमची मुख्य बंधने

**2.1.1.** तुमच्याशी सर्व व्यवहारांच्या बाबतीत आमच्याकडून विचारपूर्वक व योग्य वर्तन करणार आणि त्यासाठी आम्ही:

अ. बँकेच्या काऊंटरवर रक्कम/चेक स्वीकारणे व देणे या बँकिंग सुविधा उपलब्ध करू.

आ. जलद आणि उत्तम कर्ज सुविधा उपलब्ध करू.

इ. आमची उत्पादने व सेवा पुरविण्यात आणि पद्धति व प्रथा या बाबतीत या संहितेमधिल बाधिलकी व दर्जा चे पालन करू.

ई. आम्ही याचीही काळजी घेऊ की आमची उत्पादने व सेवा यांचा संबंधित कायदे व नियम यांचे पालन करतील आणि आपल्या आवश्यकतानुसार असतील.

उ. याची खात्री करू कि आमचे तुमच्याशी व्यवहार हे एकात्मतेचे नैतिक तत्व पाळणारे व पारदर्शक असतील.

ऊ. सुरक्षित व विश्वसनीय बँकिंग आणि **भरणा आणि सेटलमेंट प्रणाली** प्रसारित करु.

ऋ. वित्तीय अडचणींचा प्रकरणावर सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचा प्रयत्न करु. (खालील दिलेला पॅराग्राफ सं 5.8 पहा).

**2.1.2. आमची उत्पादने व सेवा कशी कामे करतात हे तुम्हाला खालील दिलेल्या माहिती आधारे समजण्यासाठी मदद होईल:**

अ. आमचे आर्थिक उत्पादने आणि सेवा बद्दल तुम्हाला हिंदी, इंग्रजी किंवा स्थानिक भाषामध्ये माहिती पुरविणे.

आ. आमच्या जाहिराती व प्रवर्तन साहित्य हे स्पष्ट असेल व गैरसमज करुन देणारे नसेल याची काळजी घेणे.

इ. तुम्हाला आमच्या उत्पादनांची व सेवांची स्पष्ट माहिती देणे, अटी व शर्ती व व्याजदर/ सेवा आकार जो लागू असेल त्याविषयी माहिती देण्याची काळजी घेणे.

ई. आमची / इतर पार्टीचे उत्पादने तुम्हाला चुकीच्या पद्धतीने विकली जाणार नाहीत याची काळजी घेणे.

उ. तुम्हाला कोणत्या सुविधा दिल्या जातात व त्या कशा घ्यायच्या याची माहिती देणे तुमच्या प्रश्नांसाठी/ तक्रारीसाठी तुम्ही कोणाला व कसे भेटावे याविषयीची माहिती तुम्हाला देणे.

**2.1.3. खालील पद्धतीने तुमचे खाते किंवा सेवा यांचा उपयोग करण्यासाठी मदत करणे.**

अ. तुम्हाला नियमितप्रमाणे योग्य व सुधारित माहिती पुरविणे.

आ. व्याजदर, आकार किंवा अटी व शर्ती यामध्ये काहीही बदल झाल्यास तुम्हाला कळविणे.

इ. आमच्या शाखेत तुमच्या माहीतीसाठी खालील गोष्टी प्रदर्शित करणे:

- **i.** आम्हीकडून दिल्या जात असलेल्या सेवा.
- **ii.** चालू खात्यासाठी आवश्यक किमान शिल्लक व किमान शिल्लक न ठेवल्यास लागणारा आकार.
- **iii.** जर तुमची काही तक्रार असण्यास तुम्ही शाखेतील कोणत्या अधिका-याला भेटावे, त्याचे नाव.

**iv.** जर शाखेमध्ये तुमच्या तक्रारीचे निवारण न झाल्यास तुम्ही ज्या झोनल/प्रादेशिक व्यवस्थापकाला/ मुख्य संपर्क अधिकारी (पीएनओ) भेटू शकता त्याचे नाव व पत्ता.

**v.** आमच्या बैंकेचे, मुख्य सतर्कता अधिकारीचे नाव, पत्ता व टेलीफोन नंबर.

**vi.** शाखा ज्या **बँकिंग लोकपालाच्या** न्यायिक क्षेत्राखाली येत असेल त्याचे नाव व पत्ता.

**vii.** पुस्तिकेच्या स्वरूपात उपलब्ध असलेली पॉलिसी/ कागदपत्रांची यादी.

**ड. खालील गोष्टींबद्दलची आमची नीती आमच्या वेबसाईटवर दिली आहे -**

**i.** ठेवीं

**ii.** चेक वसूली

**iii.** तक्रार प्रतिबंध

**iv.** नुकसान भरपाई

**v.** देय रकमा घेणे व सुरक्षा परत घेणे

**2.1.4. काही गोष्टी चुकीच्या झाल्यावर अशा वेळी खालीलप्रमाणे चटकन व सहानुभूतीपूर्ण वागणे -**

अ. चुका ताबडतोब दुरुस्त करणे व आमच्या चुकीमुळे जर बँकेने काही आकार लावला असेल तर तो रद्द करणे आणि आमच्या नुकसान भरपाई धोरण च्या नियमानुसारआमच्या चुकांमुळे आपल्याला झालेल्या आर्थिक नुकसानाची भरपाई देने.

आ. तुमच्या तक्रार मिळालीची पावती देने आणि तक्रारींची ताबडतोब दखल घेणे.

इ. जर तुमचे समाधान झाले नाही तर ती तक्रार कशी पुढे न्यावी याबद्दल माहिती देणे

ई. बँकेतील तांत्रिक चुकीमुळे कामात अडथळा आल्यास पर्यायी योग्य मार्ग वापरणे.

**2.1.5. तुमची सर्व वैयक्तिक व व्यावसायिक माहिती खाजगी व गुप्त ठेवणे.**

खालील परिच्छेद 4 मधिल बाबींच्या अधीन आम्ही तुमची सर्व वैयक्तिक व व्यावसायिक माहिती खाजगी आणि गुप्त ठेवू.

**2.1.6. संहिताच्या प्रचारासाठी / जनतेपर्यंत पोचविण्यासाठी आम्ही हे करु.**

अ. विद्यमान ग्राहकांसाठी त्यांच्याद्वारे मागणी केल्यास आम्ही संहितेची प्रत तुम्हाला काऊंटरवरून देऊ किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाने किंवा मेल द्वारे विनामूल्य देऊ.

आ. सर्व नवीन ग्राहकांना कर्ज सुविधा पुरवितांना संहितेची एक प्रत विनामूल्य देण्यात येईल.

इ. संहिता प्रत्येक शाखेमध्ये व आमच्या वेबसाईटवर पहाण्यासाठी उपलब्ध असेल.

ई. संहितेशी संबंधित माहिती तुम्हाला देण्यात व संहिते प्रमाणे प्रत्यक्षात वागण्यासाठी आमचे कर्मचारी प्रशिक्षित असतील याची आम्ही काळजी घेऊ.

उ. संहिता आणि त्यातील तरतूदी बद्दल ग्राहकांना सजग करण्यासाठी इतर उपाय केले जातील.

**2.1.7. भेदभावमुक्त नीतीचा अंगिकार करणे व प्रत्यक्षात आणणे.**

आम्ही उद्योगाचा प्रवर्तक/मालक/भागीदार यांच्या बाबतीत वय, वंश, लिंग, वैवाहिक दर्जा, धर्म किंवा अपंगत्व यावर आधारित भेदभाव करणार नाही.

**3. माहिती - पारदर्शकता**

तुम्ही खालीलपैकी कोणत्याही माध्यमातून व्याजदर, शुल्क व आकार यासंबंधीची माहिती मिळवू शकता:

अ. आमच्या शाखांमधिल नोटीस-बोर्ड

ब. आमच्या शाखेत किंवा हेल्प-लाईनवर फोन करुन

क. आमच्या वेबसाईटवर

ड. आम्ही यासाठी नेमलेल्या कर्मचा-यांकडे किंवा मदतीसाठी नेमलेल्या कर्मचा-यांकडे चौकशी करुन

ई. आमच्या शाखा आणि वेबसाईटवर असलेले **प्रशुल्क अनुसूची (टेरिफ शेड्युल)** पाहून

## 3.1. सामान्य माहिती

अ. आमच्याकडून सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी दिल्या जाणारी सर्व वेगवेगळ्या योजनांबद्दलची माहिती आपल्याला देऊ.

आ. आम्हाला हवी असलेली आमची उत्पादने व कर्जे जसे कॅश क्रेडिट, मुदत कर्जे (टर्म लोन), गॅरंटी, **बील डिस्काऊंटिंग/खरेदी**, साख-पत्र ची मुख्य वैशिष्ट्ये आणि शुल्क व आकार च्या संबंधित माहिती देऊ.

इ. तुम्ही निवडलेली आमची उत्पादने व सेवा तुमच्या गरजेनुरुप योग्य अशी असतील.

ई. आम्ही जी उत्पादने व सेवा एकापेक्षा जास्त मार्गांनी देत असू (जसे, एटीएम द्वारे, इंटरनेटवर, फोनद्वारे, शाखेमध्ये वगैरे) तर त्याची माहिती देऊ व त्याविषयी अधिक माहिती तुम्हाला कशी मिळेल हे ही सांगू.

उ. आमच्या कायदेविषयक, नियामक व आंतरिक धोरणाच्या गरजांसाठी तुमची ओळख व पत्ता सिद्ध करण्यासाठी कोणती माहिती आम्हाला आवश्यक असते, हे आम्ही तुम्हाला सांगू.

## 3.2 व्याजदर

आम्ही आपल्याला खालील माहिती देऊः

अ. आपल्या ठेवी व कर्ज खात्यांवर लागणारे व्याज दर.

आ. स्थिर (निश्चित) व्याज दरांवर कर्जाच्या बाबतीत कर्जाच्या करार मध्ये उल्लेख केलेल्या व्याज पुनर्व्यवस्था शर्तची माहीती व त्याची लागू तिथि.

इ. अस्थिर (बदलत्या) व्याज दरांवर कर्जाच्या बाबतीत आपल्या अस्थिर व्याजासंबंधित संदर्भ दर आणि आपल्या कर्जाच्या वास्तविक व्याज दर च्या निश्चितीचा संदर्भ दरावर लावलेले अधिमुल्य किंवा सूट विषयी सूचना.

ई. आपल्या कर्जाला स्थिर दर वरून अस्थिर दर मध्ये किंवा उलट रूपात बदल करण्याचा पर्याय आहे का? आणि जर असेल तर त्यावर किती आकार असेल.

उ. आपल्या ठेवीवर व्याज केव्हा देऊ किंवा आपल्या कर्जाच्या खात्यावर व्याज केव्हा आकारू.

ऊ. आम्ही आपल्या जमाठेवीवर किंवा कर्जखात्यावर कश्याप्रकारे व्याज लावतो किंवा त्यावर व्याजांची आकारणी कशी करु.

### 3.2.1 व्याजदरातील बदल

आम्ही तुम्हाला आमच्या कर्ज उत्पादनाच्या व्याजदरात कोणताही बदल किंवा अस्थिर व्याजदरासंबंधित संदर्भ दरा च्या बदलाची सुचना अशा निर्णयानंतर पंधरा दिवसांच्या आत खालील पैकी कोणत्याही सोयीच्या अशा पद्धतींनी आपल्याला कळवू.

**i.** पत्र

**ii.** ई-मेल

**iii.** एसएमएस

ही माहिती आम्ही तुमच्यासाठी आमच्या शाखांमध्ये तसेच वेबसाईटवर प्रदर्शित करु.

## 3.3 टेरीफ शेड्युल (प्रशुल्क अनुसूची)

### 3.3.1 शुल्क व आकार

अ. आपल्या पसंदीची उत्पादने व सेवांवर लागणारे सर्व शुल्क व आकारांची माहीती आम्ही आपल्याला देऊ.

आ. विविध सेवांसाठी बँकेने लावलेले शुल्क व आकार बँकेच्या मंडळाने (बोर्ड) किंवा कोणत्याही मंडळाने अधिकार दिलेल्या सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने केलेले असतील. ज्यांची अधिकारिता सर्व शाखांसाठी असेल व सर्व प्रकारच्या ग्राहकांसाठी योग्य व भेदभावमुक्त असेल यांची आम्ही काळजी घेऊ.

इ. आम्ही शुल्क अनुसूची बद्दलची नोटीस आमच्या प्रत्येक शाखांमध्ये आणि वेबसाइट वर लावू.

ई. आमच्या वेबसाईट वर व शाखांमध्ये विनामूल्य दिल्या जाणा-या सेवांची सूची प्रदर्शित करु.

उ. तुम्ही निवडलेल्या उत्पादने/सेवांचा लाभ घेताना लागू असलेल्या अटी व शर्ती यांचा भंग झाल्यास/किंवा न पाळल्यास तुम्हाला लागू होणा-या दंडा बद्दलची माहिती आम्ही पुरवू.

ऊ. बँकेच्या किंवा शाखेच्या कामकाजाच्या तंत्रज्ञानामध्ये सुधारणा झाल्याबद्दल शुल्क वाढवणार नाही.

**3.3.2. शुल्क व आकार यातील बदल**

जर आम्ही कोणतेही आकार वाढवले किंवा नवीन बदल केले तर ते आम्ही नवीन बदल लागू होण्यापूर्वी एक महिना खातेपत्रक, ई-मेल, एसएमएस/शाखांमधिल नोटीसबोर्ड द्वारे आधी जाहीर करु. ही माहिती आमच्या वेबसाईट वर देखिल देऊ.

**3.4. अटी आणि शर्ती**

अ. तुम्ही ज्या सेवा मागितल्या असतील, त्याच्याशी संबंधित अटी व शर्ती आम्ही तुम्हाला आधीच सांगू.

ब. सर्व अटी व शर्ती योग्य असतील, विशेषतः नामांकन सुविधा, भार व बंधने या बद्दलचे योग्य अधिकार दिले जातील आणि शक्यतोवर ही माहीती साध्या सोप्या भाषेत दिली जाईल.

**3.4.1. अटी व शर्ती मधिल बदल**

अ. आम्ही आमच्या अटी व शर्ती मधिल बदलाची माहिती आणि नवीन अटी व शर्ती लागु होण्यापूर्वी एक महिना आम्ही आपल्याला खालील मार्गांनी कळवू:

i. पत्रा ने

ii. ईमेल ने

iii. एसएमएस ने

जर हे बदल आमच्या सामान्य ग्राहकांवर लागु होत असतील तर आम्ही ही माहिती आमच्या वेबसाईवर व शाखांमध्ये उपलब्ध करुन देऊ.

ब. साधारण कोणतेही अटी व शर्ती चे बदल करताना एक महिन्यापूर्वी सूचना देण्यात येईल.

क. जर कोणतीही सूचना न देता आम्ही बदल केले तर असे बदल आम्ही **30** दिवसात सूचित करु. ह्या बदलांमुळे जर तुमची गैरसोय होणार असेल तर तुम्ही कोणतीही सूचना न देता **60** दिवसांत तुमचे खाते बंद करु शकता किंवा बदलू शकता. यासाठी तुम्हाला कोणताही ज्यादा आकार किंवा व्याज लागणार नाही.

## 4. गोपनीयता आणि गुप्तता

अ) आम्ही तुमची सर्व वैयक्तिक माहिती गोपनीय व गुप्त ठेवू (जरी तुम्ही नंतर आमचे ग्राहक नसलात तरी). खालील तत्व आणि नीती त्यासाठी आमचे मार्गदर्शक असतील. तुम्ही स्वतः दिलेली किंवा अन्य मार्गाने मिळालेली तुमच्या खात्यासंदर्भातील माहिती आम्ही कोणालाही अगदी आमच्याच दुस-या कंपनीला/संस्थेला सुद्धा देणार नाही. फक्त त्यासाठी खालील बाबींचा अपवाद असेल.

**i)** आम्हाला कायद्याने किंवा बैंक नियंत्रका कडुन मागितल्यावर ती माहिती द्यावी लागते.

**ii)** जनतेप्रति कर्तव्य असले तर ही माहिती जाहीर करावी लागते.

**iii)** जर आमचे हित सांभाळण्याच्या आणि/किंवा विवेकी जोखीम कमी करण्याच्या रणनीतीनुसार माहिती द्यावी लागली (उदाहरणार्थ, घोटाळा रोखणे) परंतु तुम्ही किंवा तुमच्या खात्याची माहिती (तुमचे नाव व पत्ता) आमच्याच इतर कंपन्यांसह कोणालाही विपनासाठी देण्यासाठी आम्ही हे कारण म्हणून वापरणार नाही.

**iv)** जर तुम्ही आम्हाला माहिती उघड करायला सांगितली किंवा आमच्याकडे त्यासाठी तुमची लेखी परवानगी असेल.

ब) तुम्ही स्पष्टपणे आम्हाला अधिकार दिल्याशिवाय आम्ही तुमची वैयक्तिक माहिती विक्रीच्या कारणासाठी कोणालाही देणार नाही किंवा आम्हीही वापरणार नाही.

## 4.1. कर्ज माहिती कंपन्या

अ. कर्ज माहिती कंपनी **[CIC]** ची भूमिका आणि आम्ही त्यांच्याकडे केलेली तुमची चौकशी व त्यांच्याकडून आलेली माहिती तुम्हाला समजावून सांगू व त्यांनी पुरविलेल्या माहितीचा तुम्हाला कर्ज मिळविण्यासाठी काय परिणाम होईल हे ही सांगू.

ब. तुमच्या विनंतीनुसार व तुम्ही योग्य शुल्क भरल्यानंतर **CIC** कडून आम्हाला

मिळालेली क्रेडिट इन्फर्मेशनची प्रत तुम्हाला देऊ.

क. आमच्याकडून घेतल्या गेलेल्या कर्ज रक्कमेची माहिती आम्ही ठराविक अंतराने **CIC** ला देऊ.

ड **CIC** ला पाठवलेल्या अहवाला मध्ये तुम्ही आमच्याकडून घेतलेल्या वैयक्तिक कर्जाची माहिती खालील बाबतीत दिली जाते.

i. तुम्ही कर्ज भरण्यात, निश्चित केलेल्या मुदतिनुसार, मागे पडला असाल

ii. कर्जाऊ रक्कम वादग्रस्त असेल.

इ तुम्ही कर्जाचे काही हप्ते आधी भरले नसतील, पण त्यानंतर नियमित भरले असतील, तर आम्ही त्याच्या पुढील महिन्याच्या अहवालात ही माहिती **CIC** कडे पाठवू.

ई. तुम्ही आमच्याकडून घेतलेल्या उचल/कर्जाची माहिती आम्ही ज्या **CIC** ला देतो, त्याचे विवरण तुमच्या विनंतीनुसार तुम्हाला देऊ.

उ. तुमच्या खात्याबद्दल **CIC** ला आम्ही मासिक तत्वावर अद्ययावत ठेवू, जसे विशेषतः जेव्हा सबस्टँडर्ड मधून तुमचे खाते स्टँडर्ड होईल आणि/किंवा आमच्या मतानुसार तुमचे खाते नियमित/बंद झाल्यानंतर लगेच.

ऊ. आपल्या विनंतीवरून आणि आकारले गेलेले शुल्क भरल्यानंतर कर्ज माहिती सुचना कंपनीकडून आलेली कर्जाची माहिती आम्ही आपल्याला देऊ.

ऋ. जेव्हा आपण एक ठोस रक्कम भरून (एक मुठी रक्कम भरुन केलेल्या संमझोत्यानुसार) आमचे खाते बंद करता तेव्हा आम्ही कर्ज माहिती कंपनीकडे दिलेल्या माहितीचा प्रभाव आणि भविष्यात आमच्याकडुन किंवा इतर बॅकेकडुन कर्ज घेताना आपलया पात्रतेवर पडणार्या प्रभावविषयी सांगितले जाईल.

**5. कर्ज देणे**

क. आमची कर्ज देण्याची नीती ही राष्ट्रीय नीती व विनियामकाने घालून दिलेल्या नियमाचे प्रतिबिंब असेल. एक खिडकी योजनेद्वारे सर्व सुविधा देण्याचा आम्ही प्रयत्न करु.

ख. आम्ही आमच्या वेबसाईटवर सूक्ष्म आणि लघु उध्योगाँच्या कर्जासंबद्धी व त्यांच्या पुनरवसनाची नीती देऊ. आमच्या शाखांमध्येही सदर नीति आपलया अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊ. वसूली कंपन्यांची माहिती आम्ही आपल्या विनंती नुसार नाममात्र पैसे घेऊन त्याची प्रत आपल्याला देऊ.

ग. घ. आम्ही तुम्हाला उपलब्ध सुविधा व शुल्क आणि सूक्ष्म आणि लघु उद्योग साठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट च्या क्रेडिट गॅरंटी योजनेच्या अटींची माहिती देऊ. ही योजना पात्र बँकांद्वारे दिली जाते व **CGTMSE** सूक्ष्म आणि लघु उद्योगासाठी हमी योजना म्हणून लोकप्रिय आहे. सध्या ही योजना नवीन तसेच पूर्वीपासून असलेल्या सूक्ष्म आणि लघु उद्योग साठी लागू आहे. ज्यात कमाल क्रेडिट मर्यादा प्रत्येक कर्जदारासाठी रु.100 लाख (रुपए शंभर लाख) असलेल्या सेवा उद्योगांचा समावेश आहे परंतु किरकोळ व्यापारी, शैक्षणिक संस्था. प्रशिक्षण संस्था व स्वयंसहायता गट (एसएचजी) यांचा समावेश नाही.

ड. जेव्हा कर्ज इतार कोणत्याही क्रेडीट ग्यारंटी योजनेखाली कीवा अनुदन योजणेखाली येऊ शकत असेल, तेव्हा अशा योजनेची वैशिष्ट्ये व तुम्हाला त्यासाठी पूर्ण करावी लागणारी आवश्यकता यांची माहिती देऊ.

च. भावी कर्जदारांसाठी त्यांच्या वित्तीय व्यवस्थापण बाबत ज्ञान वर्धन करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम आयोजित करण्याचा प्रयत्न करु.

छ. कल्पना व सूचनांचे आदान-प्रदान करणारा नियमित मार्ग म्हणून ठराविक कालावधिनंतर सूक्ष्म आणि लघु उद्योग कर्जदारांच्या बैठका आयोजित करण्याचा प्रयत्न करु.

## 5.1 अर्ज

क. आम्ही सरळ, समजण्यास सोपा, स्टॅन्डर्ड अर्ज विनामूल्य उपलब्ध करुन देऊ.

ख. तुमचा अर्ज सर्व त-हेने परिपूर्ण व्हावा म्हणून अर्जासोबत द्यावयाच्या दस्तावेजांची सूची (कायदेशीर व विनियामक आवश्यकतेनुसार) देऊ जेनेकरुन आपण सर्व प्रकारे एक पूर्ण अर्ज भरु शकाल. गरज पडली तर, तुमचा अर्ज भरण्यासाठी तुम्हाला मदत करु.

ग. तुम्हाला अर्ज देतानाच, लागू व्याजदर, वार्षिक व्याजदर व जर असतील तर शुल्क/आकार, आणि इतर कोणतीही जसे कि प्रक्रिया शुल्क, मुदतपूर्व भरण्याचा पर्याय व त्याचे शुल्क व इतर बाबी जश्या उपलब्ध सीएजीटीएमएसई ग्यारंटी सारखे तुमच्या हितास बाधक अशी गोष्ट असेल तर सांगू यामुळे इतर बँकांशी अर्थपूर्ण तुलना करुन निर्णय घेण्यात तुम्हाला मदत होईल.

घ. प्रत्यक्ष किंवा ऑनलाईन अर्ज भरल्यावर त्याची लिखित पोचपावती दिली जाईल, ज्यामध्ये तुमचा अर्ज निकाली काढण्यास लागणारा वेळ दिलेला असेल.

ड. साधारणतः कर्ज सुविधेचा अर्ज देतानाच अर्जाच्या प्रक्रियेसाठी लागणारी सर्व माहिती गोळा केली जाईल. जर यापेक्षा जास्त काही माहितीची गरज पडली तर, आम्ही अर्ज मिळाल्यापासून कामाच्या सात दिवसांच्या आत तुमच्याशी संपर्क करु.

च. सध्या चालू असलेल्या कर्ज सुविधेचे नूतनीकरण करताना ती सुविधा समाधानकारक रित्या चालू असल्यास, जी माहिती आमच्याकडे अगोदरच नाही, फक्त अशीच माहिती तुमच्याकडून घेण्याचा प्रयत्न करु.

छ. आमच्याकडून मान्य झालेले व तुम्ही घेतलेले कर्ज/उधार सुविधेसाठी लागू असलेल्या अत्यंत महत्वाच्या अटी व शर्ती (**MITC**) तुम्हाला देऊ.

ज. तुमच्या अर्जाची स्थिती तुम्हाला ऑनलाईन जाणून घेता यावी यासाठी प्रयत्न करु.

झ. मंजूर झाले अथवा नाही झाले तरी, रु.5 लाखापर्यंतच्या कर्जासाठी कोणतेही प्रक्रिया शुल्क लावणार नाही.

ञ. रु.5 लाख पर्यंतचा कर्ज सुविधेचा किंवा कर्ज सुविधा वाढविण्याचा तुमचा अर्ज मिळाल्यापासून दोन आठवड्यात निकाली काढू, रु. 5 लाख ते 25 लाख पर्यंतचा अर्ज तीन आठवड्यात तर रु. 25 लाखापेक्षा जास्त रकमेचा अर्ज सहा आठवड्यात निकाली काढू, मात्र सर्व त-हेने तुमचा अर्ज पूर्ण असावा व सूचीमध्ये दिल्याप्रमाणे सर्व दस्तावेज अर्जासह दिलेले असावेत.

**5.2. पत (क्रेडिट) मूल्यांकन**

**क.** आम्ही अर्जाच्या प्रक्रियेसाठी व मूल्यांकना साठी खालील गोष्टी करू

**i.** आम्ही किवा आमचे कर्मचारी / यासाठी नेमलेले प्रातिनिधि तुमच्या कार्यालयाच्या/घरच्या पत्त्यावर तुमच्याशी संपर्क करुन तुम्ही अर्जात दिलेली माहिती पडताळून पाहतील.

**ii.** तुम्हाला कर्ज देण्यापूर्वी किंवा तुमच्या ओव्हरड्राफ्ट किंवा कर्जाची मर्यादा वाढवण्यापूर्वी, तुमच्या अर्जाचे सखोल आकलन साक्षेपाने मूल्यांकन करु.

**iii.** तुम्ही केलेल्या अंदाजाच्या वाजवीपणा बाबत आम्ही आमचे समाधान करुन घेऊ.

**iv.** तुमच्या कर्जाची आवश्यकता तपासून पाहताना आम्ही तुमच्या धंद्याचा हंगामीपणा व चक्रीयता विचारात घेऊ आणि गरज असेल तर, स्वतंत्र कमाल व किमान कर्जसीमा निर्धारित करु.

**ख. योग्य मूल्यांकन करण्यासाठी आम्हाला खालील माहितीची आवश्यकता असेल**

**i.** कर्जाचे कारण

**ii.** तुमच्या धंद्याची योजना

**iii.** तुमच्या धंद्यातून पैशाची आवक, नफा आणि सध्या असलेली वित्तीय बांधिलकी, जेथे गरज असलेले तेथे लेखा विवरणपत्रे जोडावीत

**iv.** तुमची वैयक्तिक वित्तीय बांधिलकी

v. यापूर्वी तुम्ही तुमचे पैसे/भांडवल कसे हाताळले होते**?**

vi. क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीकडून मिळणारी माहिती

vii. जर असेल तर पतमानांकन कंपनींकडून मिळालेला असल्यास, दर्जा

viii. इतरांकडिल माहिती, जसे दुसरे सावकार/धनको

ix. बाजार अहवाल (मार्केट रिपोर्ट)

x. तारणच्या रूपात दिलेले प्रोजेक्ट व मशिनरी किंवा स्थावर मालमत्ता ची आमच्या अभियंता/वकील कडुन मूल्यांकन कायदेशीर छाननी, अहवाल यांची आवश्यकता असेल.

xi. जर आवश्यकता असेल तर ग्राहक त्या कर्जाला **CGTMSE** विमा मध्ये अंतर्भाव करायला तयार असेल का.

xii. इतर आनुषंगिक माहिती

**ग) आम्ही हे करु-**

i. रु. 10 लाख किंवा रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी निर्धारित केलेल्या कर्जमर्यादेपर्यंत आम्ही दुय्यम (कोलॅटरल) तारणाचा आग्रह धरणार नाही.

ii. तुमची आर्थिक स्थिती चांगली असल्याबद्दल व तुमचा पूर्वेतिहास चांगला असल्याबद्दल आमचे समाधान झाले तर रु.25 लाखपर्यंतचे कर्ज दुय्यम सुरक्षेशिवाय देण्याचा विचार करु.

iii. तुम्हाला मान्य केलेली रु.100 लाखपर्यंतची कर्ज मर्यादा **CGTMSE** च्या कर्ज हमी योजनेखाली घेण्यासाठी तुमची अनुमती घेऊ आणि त्यामुळे रु.100 लाख कमाल मर्यादेपर्यंत दुय्यम तारण/ प्रतिभूती आणि/किंवा तृतीय पक्षीय हमी देण्याचा आग्रह धरणार नाही; जर ही सुविधा आमच्यातर्फे संमत केलेली पात्र सुविधा असेल आणि **CGTMSE** योजनेखाली विमाकृत आणि तुमची संमति असेल तर.

iv. तुम्ही (उत्पादन उद्योगाना) तुम्ही अनुमानित केलेल्या वार्षिक उलाढालीच्या किमान 20**%** रक्कम इतके सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी (उत्पादन) खेळते भांडवल कर्जमर्यादा म्हणून निश्चित करु.

v. उत्पादन अनुमानित केल्यापेक्षा जास्त झाले किंवा सुरुवातीला अंदाजित केलेले खेळते भांडवल अपुरे आहे असे दिसले आणि यासाठी तुम्ही आवश्यक पुरावा सादर केला; तर अशा परिस्थितीत खेळते भांडवल योग्य प्रकारे वाढवून देण्याची तुमची विनंती मान्य करण्याचा विचार करु.

**घ) गॅरंटीज (हमी)**

जर तुमच्या कर्जावर इतर कोणीतरी दिलेली हमी किंवा सुरक्षा आम्ही स्वीकारावी असे तुम्हाला वाटत असेल तर तुमची वित्तविषयक गोपनीय माहिती त्यांना किंवा त्यांच्या कायदेशीर सल्लागाराला देण्याची परवानगी आम्ही तुमच्याकडून घेऊ. त्याचबरोबर आम्ही..

i. त्यांची बांधिलकी आणि त्यांच्या निर्णयाचा परिणाम त्यांनी समजून घेतला आहे याची खात्री करुन घेण्यासाठी त्यांना स्वतंत्र कायदेशीर सल्ला घेण्यास उद्युक्त करु. (जेथे गरज असेल तेथे, ज्या कागदपत्रांवर आम्ही त्यांना सह्या करण्यास सांगू त्यावर स्पष्ट व उघड सूचना म्हणून वरिल सल्ला/शिफारस केलेली असेल.)

ii. त्यांना हे सांगू की, हमी किंवा तारण/ प्रतिभूति देण्यामुळे तुमच्या इतकेच तेही जबाबदार ठरतात.

iii. तुम्ही जी कर्ज सुविधा घेतली आहे ते कर्ज मंजूर झाल्याच्या/कर्ज कराराच्या अटी व शर्तींची एक प्रत हमीदारास देऊ.

iv. तुमच्या मुदत कर्ज खात्याच्या वार्षिक विवरण पत्राची प्रत कर्जाच्या हमीदारास देऊ.

**5.3 मंजूर / नामंजूर (फेटाळणे)**

आम्ही हे करु-

क. कोणतीही कर्ज सुविधा मंजूर करण्यासाठी भरपाई म्हणून काहीही ठेव ठेवण्यासाठी आग्रह करणार नाही

ख. तुम्हाला ओव्हरड्राफ्ट देताना किंवा सध्याची ओव्हरड्राफ्टची मर्यादा वाढवून देताना, तुमचा ओव्हरड्राफ्ट मागणी केल्यावर देय आहे किंवा कसे हे सांगू.

ग. मंजूर केलेले कर्ज देताना अटी, शर्ती व इतर सावधानी सूचना लिखित स्वरुपात देऊ. ते कायद्याने प्रमाणित करु व त्याची प्रत तुम्हाला देऊ.

घ. तुम्ही निष्पादित केलेल्या कर्जासाठीच्या कागदपत्रे, त्याच बरोबर कर्ज कागदपत्रामध्ये दिलेल्या सर्व संलग्न कागद व त्याची यादी यांच्या प्रमाणित प्रति आमच्या खर्चाने तुम्हाला देऊ.

ङ. कर्ज किंवा उधारी मंजूर न करता आल्यास, त्याची कारणे लिखित स्वरुपात तुम्हाला कळवू.

च. दर्जा देण्याची प्रणाली अवलंबू, ज्याचे मानक तुम्हालाही कळवू.

छ. निश्चित (स्थिर) व्याजदर असलेले रु.50 लाखापर्यंतचे कर्ज मुदतीपूर्वी त्याबद्दल कोणतेही शुल्क न लावता फेडण्यास परवानगी देऊ.

ज. बदलता व्याजदर असलेले कर्ज मुदतीपूर्वी, त्याबद्दल कोणतेही शुल्क न लावता, फेडण्यास परवानगी देऊ.

झ. कर्ज मंजूर करताना ठेवलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन केल्यानंतर कर्ज मंजूर झाल्या दिवसानंतर कामकाजाच्या दोन दिवसांच्या आत कर्जाची रक्कम वितरित करु.

ञ. कर्ज फेडीची तरतूद (कर्ज मुदती दरम्यान फेडावयाची मुद्दल व व्याजाच्या रकमेचे वेळापत्रक) तुम्हाला देऊ.

ट. तुम्हाला दिलेल्या कर्ज मंजूरी पत्रातील अटी व शर्तीनुसार वेळोवेळी आढावा घेण्याची व नवीकरणाची सुविधा देण्याची काळजी घेऊ.

### 5.4. केंद्रीय नोंदणी (सेंट्रल रजिस्ट्री)

जेव्हा तुम्ही स्थावर मालमत्तेला प्राथमिक किंवा दुय्यम बंधनावर ठेऊन कर्ज सुविधा घ्याल तेव्हा केंद्रीय नोंदणी शाखेची कार्यपद्धति तुम्हाला सांगू व कोणताही कर्जदार किंवा त्या संपत्ती संदर्भात व्यवहार करण्यास इच्छुक व्यक्तिला ते अभिलेख शोधण्यासाठी उपलब्धता सांगू.

## 5.5. वितरणोत्तर- वितरनापच्यात

आम्ही हे करु-

क. कर्ज मंजूर करण्यास लागणा-या अटी, कर्ज करारनामा किंवा अनुकुल अथवा प्रतिकुल माहिती आम्हाला समजली तर अशा परिस्थिती शिवाय इतर वेळी तुमच्या कारभारात ढवळाढवळ करणार नाही.

ख. आमची नियंत्रण पद्धति विधायक राहील यासाठी प्रयत्न करु व तुमच्या आमच्याशी व्यवहारात काही ख-या अडचणी आल्यास त्या सहानुभूतीपूर्वक सोडवण्याचा प्रयत्न करु.

ग. अशाच प्रकारची कर्जसुविधा इतर कोणत्याही संस्थेतून घेतली तर ते तुम्ही आम्हाला कळविणे आवश्यक आहे.

घ. खालील माहिती तुमच्याकडून नियमितपणे घेऊ.

**i.** ठराविक काळात स्टॉक आणि इतर विवरण माहिती.

**ii.** तुमच्या तुम्ही केलेल्या कारभारातील अंदाजाशी प्रत्यक्ष निकाला बरोबर तुलना.

**iii.** तुमच्या व्यवसाय योजनेच्या महत्वाच्या पैलूंची प्रगति.

**iv.** ताळेबंद व नफा-तोटा पत्रक व वार्षिक ताळेबंदाशी इतर संबंधित कागदपत्रे

**v.** तुमच्या धनको व ऋणको यांची वयानुसार विभागणी व त्यात गुंतलेली रक्कम.

ङ. नेहमी घेण्याच्या खबरदारी नुसार तुमच्या मर्यादेप्रमाणे पैसे काढण्याची अनुमति देऊ.

च. जर तुमची व्यावसायिक परिस्थिती बदलली तर, तुमच्याकडून आवश्यक नवीन माहितीबद्दल तुमच्याशी बोलू.

छ. तुमच्याकडून किंवा बँक/वित्तीय संस्था जे तुमचे खाते घेणार आहेत, त्यांच्या कडून खाते बदल करुन देण्याची विनंती आल्यापासून दोन आठवड्याच्या आत आमचा होकार किंवा इतर काही कळवू.

ज. कर्जफेड पूर्ण झाल्यावर आणि कोणत्याही परिस्थितीत करार केलेली किंवा मान्य केलेली सर्व देणी फेडल्यानंतर 15 दिवसांच्या आंत तुमच्या सर्व प्रतिभूति परत देऊ. जर दुस-या कोणत्याही दाव्यासाठी यातील हक्क बदलून घ्यायचा असेल, तर त्या दुस-या दाव्याची पूर्ण माहितीस तुम्हाला रीतसर सूचना पाठवू व तो संबंधित दावा पूर्णपणे फेडला जाईपर्यंत ते तारण/दस्तावेज/गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे हक्क आमच्याकडेच ठेवू.

झ. तुमच्याकडून विनंति आल्यानंतर त्याच दिवशी तारण/पोच देऊ.

ञ. तुम्ही प्रतिभूति दिल्यानंतर 24 तासांच्या आत तुमची पैसे काढण्याची मंजूर मर्यादेच्या अंतर्गत मर्यादा वाढवून देऊ.

ट. तुमच्या नेहमी वापरातील खात्यातील नियमित विवरणपत्रका शिवाय मुदत कर्जाच्या खात्यांचे वार्षिक विवरण पत्रक पण देण्यात यईल.

ठ. कर्जाचा व्यवहाराचे विवरण पत्रक जास्त वेळी अपेक्षित असेल तर शुल्क सारिणी मध्ये लागु ठराविक आकार लागु करुन अहवाल देण्यात येईल.

ड. खालीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक पद्धतींनी तुमच्या व्यावसायिक प्रगतिवर लक्ष ठेवू.

**i.** तुमच्याकडिल मालाच्या नियतकालिक विवरणपत्राची छाननी करु.

**ii.** आमच्याकडिल तुमच्या खात्यातील व्यवहारांवर लक्ष ठेवू.

**iii.** आमचे कर्मचारी किंवा अधिकृत प्रतिनिधी तुमच्या परिसरात भेट देऊन मालाचे आणि/किंवा ज्यासाठी वित्तसहाय्य दिले आहे अशा मालमत्तेचे सत्यापन करतील.

**iv.** जेव्हा गरज असेल तेव्हा तुमचा व्यवसाय कसा चालला आहे, याचा मार्केट रिपोर्ट घेऊ.

ढ. जर तुमचे खाते अनियमित असेल आणि ते अनुत्पादक मालमत्तेत (**NPA**) होण्याचे संकेत असतील तर तुमच्याशी पत्र/मेल किंवा **SMS** सारे संपर्क करण्याचा प्रयत्न करु.

ण. जर आम्ही कर्ज परत मागविण्याचे ठरविले किंवा अधिक प्रतिभूतिंची गरज आहे असे वाटले, तर पुरेसे अगोदर तुम्हाला सूचना पाठवू.

## 5.6. निधीतर आधारित (नॉन फंड बेस्ड) सुविधा

आम्ही साख-पत्र (एलसी) देण्याआधी, माहिती देने, निश्चिती इत्यादी द्वारे किंवा गॅरंटी देण्या मार्फत भांडवल साधने किंवा कच्चा माल/उपभोग्य वस्तू इ. खरेदी करण्यासाठी आम्ही निधीतर आधारित सुविधा देऊ. लेटर ऑफ क्रेडिट, गॅरंटी जमा रक्कम इ. राष्ट्रीय कायदा व त्याच्याशी संलग्न नियम आणि आंतरराष्ट्रीय चेंबर ऑफ कॉमर्स (वाणिज्य) (**ICC**) ने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या प्रकाशनांमधिल लागू असलेल्या नियमांनी या सुविधा शासित आहेत व तुम्ही ते मान्य केले पाहिजे.

## 5.7. विमा

क. जर आम्ही कोणत्याही विमा कंपनीचे एजंट म्हणून कोणत्या प्रकारचा विमा देऊ शकत असलो तर ते सांगू.

ख. विमा उत्पादने घेत असल्याबद्दलची लेखी मान्यता तुमच्या कडून घेऊ.

ग. आमच्याकडून घेतलेल्या कर्जाबद्दल जर तुम्ही आमच्याकडे तारण मालमत्ता ठेवली असेल तर अमुकच विमा कंपनीकडून तुम्ही विमा घेतला पाहिजे असे सांगणार नाही.

## 5.8. वित्तीय अडचणी

आम्ही कशी मदत करु शकू-

**5.8.1.** वित्तीय अडचणींचा आम्ही सहानुभूतीपूर्वक व सकारात्मक दृष्टीने विचार करु. सहसा तुमच्या अडचणी तुम्ही प्रथम निश्चित करून आम्हाला त्या शक्य तितक्या लवकर कळवाव्या. जर आम्हाला तुमच्या अडचणी समजल्या तर आम्ही त्या तुम्हाला लेखी कळवू. जर विनावीलंब कार्रवाईची आवश्यकता वाटल्यास आम्ही फोन, फॅक्स किंवा ई-मेलने संपर्क साधण्याचा प्रयत्न करु.

**5.8.2.** खालील यादीत अशी काही उदाहरणे आहेत. ज्याबाबत आम्हाला चिंता वाटेल तथापि त्याबाबत  तुम्ही माहिती देत नसालः

क. जेव्हा व्यावसायिक उत्पादनांची सुरवात करण्यास विलंब होत असेल आणि जेव्हा खर्च अपेक्षेपेक्षा जास्त वाढत असेल.

ख. जेव्हा नियतकालिक देण्याची माहिती जसे मालाचे विवरणपत्र, नवीकरण माहिती, ऑडिट आर्थिक माहिती इ. देण्यात अवास्तव विलंब होत असेल.

ग. तुमच्या कॅश क्रेडिट/चालू खात्यामधील चेक वारंवार परत जात असतील

घ. जर तुमची मान्य केलेली कर्जमर्यादा वारंवार वाढवून घेत असाल.

ङ. जर तुमच्या व्यावसायिक उलाढालीमध्ये तुमच्याकडून निश्चित स्पष्टीकरण न येता, फार मोठी चढउतार होत असेल.

च. जर विनाकारण फार काळपर्यंत काम थांबत/प्रलंबित होत असतील.

छ. जर व्यवसाय तोट्यात चालत असेल

ज. जर तुमच्या व्यवसायाचा भागिदार किंवा सहकर्मि किंवा महत्वपूर्ण ग्राहक किंवा कर्मचारी अचाणकपणे सोडुन जात असेल.

झ. मुख्य कामकाजात बदल किंवाव्यवसायाच्या मोठ्या भागाची विक्री.

ञ. जर तुम्हाला दिलेले कर्ज तुम्ही मान्य केलेल्या कारणाशिवाय इतर कारणांसाठी वापरले किंवा ती रक्कम अपेक्षित व्यवसायापेक्षा इतर ठिकाणी वळवली.

ट. जर तुम्ही नियत कालांतराने व्याज भरले नाही

ठ. जर तुम्ही मान्य केलेल्या कर्जाच्या परतफेडीचे वेळापत्रक पाळता आले नाही.

ड. तुम्ही काढलेली देयके तुमच्या ग्राहकांकडून फेडली न जाता वारंवार परत येत असतील.

ढ. तुमच्या पुरवठादारांनी तुमच्यावर काढलेली देयके तुमच्याकडून फेडली न जाण्याचा प्रसंग वारंवार येत असेल.

ण. तुमच्यासाठी आम्ही दिलेली हमी जेव्हा पुन्हा पुन्हा वठवण्यासाठी येते.

त. जर तुमची देयके आणि येणे रक्कम उलाढालीशी सुसंगत नसतील.

थ. जर सर्व विक्रीतुन आलेली रक्कम तुमच्या खात्यातून वळती होत नसेल.

द. जर तुम्ही मान्य केलेल्या अटीची पूर्तता करत नाही.

ध. जर कर्ज रोख्यामध्ये मान्य केलेली माहीती दिली जात नसेल.

न. जर दुस-या कोणी कर्जदाराने तुमच्या विरुद्ध व्यवसाय समापन किंवा इतर कायदेशीर कार्यवाई साठी अर्ज केला असेल.

**5.8.3.** तुमच्या अडचणींमधून बाहेर येण्यासाठी आम्ही तुम्हाला सर्व प्रकारचे सहाय्य करु. तुमच्या सक्रिय सहकार्याने तुमच्या वित्तीय संकटाशी सामना करण्यासाठी योजना तयार करु. ज्या गोष्टी आम्ही मान्य केल्या त्या तुम्हाला लिखित स्वरुपात देऊ.

**5.8.4.** आम्ही तुम्हाला आर्थिक समुपदेशन देण्याचा प्रयत्न करु. ज्यामुळे तुम्हाला तुमच्या वित्तीय अडचणींचा सामना करण्यास मदत होईल.

**5.8.5.** क. जर तुम्ही अडचणीत असाल, तर जर तुम्ही सांगितले तर आम्ही तुमच्या सल्लागारांबरोबर काम करु. तुम्ही चांगल्या भावनेने काम करणे, कामाच्या प्रगतिबद्दल आम्हाला माहिती देणे, तुमचा करार आमच्याकडे ठेवणे व आवश्यक बदल वेळच्यावेळी करणे महत्वाचे आहे.

ख. आम्ही तुम्हाला अधिक वित्तीय माहिती/वचनबद्दता मागु, ज्यामुळे आपल्याला एकत्र काम करताना तुमच्या अडचणी अधिक चांगल्या पद्धतीने कळतील.

## 5.9. आजारी सूक्ष्म आणि लघु उद्योग ची देखभाल व ऋण पुनर्रचना-

5.9.1 जर जर तुमचे कर्ज खाते 3 महिन्यापेक्षा जास्त काळ सबस्टॅन्डर्ड (अपेक्षित दर्जामध्ये घसरण) राहिले किंवा मागिल वर्षाच्या कालावधित तुमची एकूण मालमत्तेचा 50% पर्यंत अपरिहार्य कारणास्तव मालमत्तेत कमी आली असेल तर तर देखभाल/ऋण पुनर्रचना कार्यक्रम तयार करण्याचा विचार करु.

**5.9.2 पुनर्वसन/ऋण पुर्नरचनेची तुमच्या विनंतीचा विचार करण्यासाठी आम्ही हे करु**

क. हे पाहिले जाईल कि तुमची कंपनी /प्रोजेक्ट व्यवहार्य/ संभावित व्यवहार्य आहे आणि याबाबत 3 महिन्याचा आत आम्ही आमची मते कळवू.

ख. जर तुमचा युनिट व्यवहार्य / संभावित व्यवहार्य आढळली तर आम्ही तुमच्या पुनरुज्जीवनासाठी वेळेवर दोष निवारण करण्याची सुरुवात करू.

ग. जर तुमचे युनिट समर्थ आहे व सहव्यवस्था/बहुबँकिंग व्यवस्थेखाली असेल आणि जर आमच्याकडील थकबाकीचा भाग मोठा असेलतर पुनर्रचनेचे पॅकेज/कार्यक्रम आम्ही तयार करू.

घ. असा एक पुनर्वसन कार्यक्रम तयार करु कि, ज्यामध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांप्रमाणे तुमचे अंशदान असेल आणि त्याची अंमलबजावणी तुमची विनंती आल्यापासून जास्तीत जास्त 60 दिवसांच्या आत सुरु केला जाईल.

ङ. जर तुमचा युनिट अव्यवहार्य म्हणुन घोषित केले तर तुम्हाला एक संधी दिली जाईल ज्यामुळे तुम्ही तुमची स्थिति आमच्या उच्च अधिकारी समोर मांडू शकतात.

**5.9.3** जर आम्हाला वाटले की हा पुनर्वसन कार्यक्रम यशस्वी होऊ शकणार नाही, तर त्याची कारणे आम्ही तुम्हाला सांगू व तुम्हाला व तुमच्या सल्लागारांना दुसरे पर्याय शोधायला सांगू.

**5.9.4** जर आपल्यात सहमती होऊ शकली नाही तर तुम्हाला हे स्पष्ट करु कि आम्ही कां तुम्हाला पाठिंबा देऊ शकत नाही व आमचा पाठिंबा केव्हा अंतिमततः काढून घेऊ हे सांगू.

**5.10. एक वेळ / एक मूठी कर्ज परत फेड समझोता**

क. जर बॅकेद्वारे एक वेळ परतफेड योजना आणली तर त्याला बॅकेच्या वेबसाइटवर प्रदर्शित करु आणि इतर संभावित साधनाद्वारे त्याचा प्रसार केला जाईल.

ख. तुमच्या देय रकमेची परत फेड करण्यासाठी आम्ही एक वेळ समझोता योजना (**OTS)** देऊ केली, तर त्या योजनेची पूर्ण माहिती देऊ.

ग. तुम्हाला देय केलेल्या एक वेळ परतफेड समझोता अंतर्गत अटी व शर्ती लिखित स्वरुपात देऊ.

घ. ह्या योजनेचा लाभ घेण्यासाठी आम्ही तुम्हाला अर्ज करण्यासाठी आणि शिल्लक रक्कम परतफेड करण्यासाठी लागणारा वेळ देऊ.

ङ. जर **OTS** प्रस्ताव मान्य केला तर, क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीज (**CIC**) ने ठेवलेल्या तुमच्या पत इतिहासाचा अशा सेटलमेंटमुळे होणारा परिणाम तुम्हाला समजावून सांगू.

### 5.11 कर्ज व देयतेचे प्रतिभूतिकरण

क. जर आम्ही तुमचे कर्ज/ शिल्लक राशी ला दूसरी संस्थेला देयतेची रकम विकली तर आम्ही त्या संस्थेचे नाव, तुमच्या कर्जाची मिळणारी जी त्यांचेकडे वळती केली असेल त्याची माहिती तुम्हाला देऊ. सर्वसाधारण पणे जी कर्जे / देयके विहित अटि व नियमाचि पुर्तता करित नाहीत तर त्यास विक्रय-पत्र द्वारे कर्ज पुनर्जिवित कंपनीला विकण्यावावत विचारात घेतले जातात.

ख. अश्या स्थितित तुमची ही जबाबदारी असते कि ज्या संस्थेत कर्ज रक्कम अंतरित केलेली असते त्या संस्थेला तुम्हाला पुर्ण रक्कम परतफेड करावी लागते.

ग. ज्या संस्थेला कर्ज/ देयकेची रक्कम अंतरित केली असेल ती कर्ज माहिती कंपनी ला तुमच्या कर्ज/ देयकांची माहिती क्रेडिट इंफॉर्मेशन कंपनी कडे पाठवत राहिल.

घ. आमच्या द्वारे ज्या संस्थेत कर्ज /देय रक्कम अंतरित केली असते त्याच्याविरुद्ध तुमची तक्रार असेल तर आम्ही तुम्हाला मदद करण्याचा प्रयत्न करु.

## 6 देय राशि वसूली आणि गहाण मालमत्तेवर पुनः कब्जा करण्याचे धोरण

### 6.1देय रकमेची वसुली

क. जेव्हा आम्ही कर्ज देऊ तेव्हा रक्कम, अवधि आणि परतफेडीचा निश्चित कालावधि या संबंधाने परतफेडीची पद्धत सांगू. तथापि, जर तुम्ही परतफेडीचे वेळापत्रक पाळले नाही

तर, तुमचे कर्ज मान्य करतानाच देशातील कायद्यानुरुप देय रकमेच्या परतफेडीसाठी निश्चित केलेली पद्धती अवलंबू.

ख. शिल्लक रकमेची परतफेड आणि तारण वर ताबा किंवा वसुली करणारे एजंट ची नियुक्ती आम्ही बोर्डाद्वारा मंजूर केलेल्या नीतिनुसार करु.

ग. वसुली एजंट ची नियुक्ती वेळेस सर्व संबंधित कायदे, नियम, निर्देशांचे मंजूरी साठी अटी, परवाने आणि नोंदणी यांचा विचार करु.

घ. आम्ही ही खात्री घेऊ कि सर्व एजंट त्यांच्या जबाबदार्या ना सावधानी आणि संवेदनशील रुपाने पार पाड्ण्यासाठी पुर्ण पणे शिक्षित आहेत. आम्ही खात्री देतो कि ते त्यांचा मर्यादेतच काम करतील.

ङ. या पद्धतीमध्ये तुम्हाला प्रतिभुती/तारण माल ताब्यातघेण्यापूर्वी पत्राद्वारे किंवा व्यक्तिशः भेट घेऊन स्मरण केले जाइल.

च. यात चूक झाल्यास तुमची केस वसूली एजंटकडे पाठवू. परतफेडीची कारवाई सुरु झाल्याचे तुम्हाला कळवू.

छ. परतफेडीची कारवाई सुरु केल्यावर आम्ही तुम्हाला सांगू की जर तुम्हाला या संदर्भात तक्रार करायची असेल तर आमच्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधा.

ज. आमच्या वसूली एजंटाच्या गैर आचरणाबाबत तुमच्या तक्रारीचा तपास करु. जर तुमच्याकडून बँकेचा प्रतिनिधी/वसूली एजंट गैर वागणूक किंवा आचार संहितेचे उल्लंघन करीत आहे अशी तक्रार आली तर आम्ही त्या संबंधात पूर्ण तपास करु व तुमची तक्रार आल्यापासून एक महिण्याच्या आत त्याबाबतचे निष्कर्ष तुम्हाला कळवू आणि जेथे योग्य असेल तेथे. असल्यास नुकसान भरपाई देऊ.

## 6.2. देणी वसूल करणे आणि प्रतिभूती परत घेणे

आमचे देणी वसूल करण्याचे आणि प्रतिभूती परत घेण्याच्या धोरणांचा कायद्याशी सुसंगत असेल. हे धोरण आमच्या वेबसाइटवर प्रदर्शित केली जाईल आणि याची एक प्रत तुमच्या अवलोकनार्थ आमच्या शाखेत उपलब्ध केली जाईल.

क. आमची देणी गोळा करण्याची नीती सौजन्य, योग्य व्यवहार व समजून पटेल अशी आहे. आम्ही ग्राहकांचा विश्वास संपादन करणे व दीर्घ काळापर्यंच्या नात्यावर विश्वास ठेवतो. आमच्या नीतीचा भाग म्हणून-

**i.** तुमच्या देणी रकमे बद्दलची पूर्ण माहिती आम्ही तुम्हाला देऊ आणि जेव्हा देणी देय असतील त्याच्या पुरेशा अगोदर तुम्हाला कळविण्याचा प्रयत्न करु.

**ii.** तुमच्याकडून वसूली सुरु करण्यापूर्वी तुम्हाला लेखी कळवू आणि ज्या वसुली एजंट ला तुमच्याकडुन वसुली चे काम दिले जाईल त्या वसुली एजंट चे नाव, पत्ता आणि टेलिफोन नंबर आपल्याला देऊ.

**iii.** आम्ही नेमलेल्या वसूली एन्जसी फर्म/कंपनी बद्दलची माहिती आमच्या वेबसाईटवर देऊ.

**iv.** विनंति केल्यास वसली एजन्सी फर्म/कंपनीची माहिती आमच्या शाखांमध्ये सुद्धा उपलब्ध करुन देऊ.

**v.** आमचे कर्मचारी किंवा पैसे किंवा तारण जमा करण्यासाठी प्राधिकृत केलेली कोणीही व्यक्ति स्वतःची ओळख करुन देईल व आम्ही दिलेले अधिकारपत्र आपल्याला दाखवेल. शिवाय आपण विचारल्यास बँकेने दिलेले किंवा प्राधिकृत केलेले ओळखपत्र दाखवेल.

**vi.** वसूलीसाठी एजन्टस पाठवण्यापूर्वी आम्ही त्या प्रकरणाची आमच्याकडे नीट तपासणी करु. म्हणजे आमच्या चुकीमुळे तुम्हाला त्रास होणार नाही.

ख. तुमच्याविरुद्ध वसूली कर्मचारी किंवा बँकेने ज्याला वसूली करण्यासाठी किंवा ताबा घेण्यासाठी अधिकृत केले आहे अशा व्यक्ति ने साक्षेपाने काम करणे अपेक्षित आहे व ते खालील मार्गदर्शक तत्वाचे पालन करतील.

**i.** सहसा तुम्हाच्या व्यवसाय/कार्यालयातच तुमच्याशी संपर्क साधला जाईल, असे विशिष्ट ठिकाण तुम्ही न सांगितल्यास तुमच्या घरी किंवा हेही शक्य न झाल्यास तुमच्या कामाच्या ठिकाणी किंवा एजंट च्या ठिकाणी तुमची भेट घेतली जाईल.

**ii.** अधिकृत व्यक्तिची ओळख व अधिकार तुम्हाला सांगितला जाईल.

iii. तुमचा खाजगीपणा व प्रतिष्ठा जपली जाईल.

iv. तुमच्याशी सभ्यपणे संवाद साधला जाईल.

v. तुमच्या कामाच्या किंवा धंद्याच्या दृष्टीने शक्य नसल्यास किंवा विशेष परिस्थिती सोडून सहसा आमचे प्रतिनिधी तुमच्याशी सकाळी **7.00** ते संध्याकाळी **7.00** या वेळात संपर्क साधतील.

vi. विशिष्ट वेळी किंवा विशिष्ट जागी फोन न करण्या विषयीची तुमची विनंती शक्यतोवर मानली जाईल.

vii. फोन केल्याची वेळ व संख्या आणि बोलणे नोंदवून ठेवले जाईल.

viii. देय रकमेबाबतचे वाद किंवा मतभेद दोन्ही पक्षांना मान्य होण्यासारखे व योग्य रितीने सोडविण्यासाठी पूर्ण मदत केली जाईल.

ix. पैसे वसूलीसाठी तुमच्या कडे आले असता सभ्यता व औचित्य सांभाळले जाईल. आमचे अधिकारी/एजंट कोणत्याही व्यक्तीशी कोणत्याही प्रकारे मौखिक किंवा शारीरीक धमकी किंवा जोर-जबरदस्ती चा पर्याय निवडणार नाही, ज्यात आपल्या किंवा आपल्या परीवार सदस्य, मित्र किंवा ओळखीचे व्यक्तीच्या व्यक्तिगत आयुष्यात त्रास देणे, धमकी किंवा चुकीचे फोन करुन खराब बोलने पण मानले जाईल.

i. तरिही, हे तुमची जबाबदारी आहे कि तुम्ही तुमचा संपर्क माहिती वेळोवेळी दुरुस्त करत रहाणे. जर तरीही बँक आपल्याशी संपर्क करु शकली नाही तर बँक सरकारी माध्यमाद्वारे माहिती गोळा करेल आणि तुमच्याशी संपर्क साधन्यासाठी तुमचे मित्र किंवा नातेवाईकांकडे संपर्क करेल.

x. वसूलीचे फोन करण्यासाठी किंवा भेटीसाठी अयोग्य वेळा जसे कुटुंबातील कुणाचा मृत्यु अगर इतर वाईट घटनांचा काळ टाळला जाईल.

**xxxxxxxxxxxxx**

## <u>अनुबंध : शब्दावली</u>

**एवालाइजेशन**

एवल म्हणजे एक प्रकारे बँकेच्या विनिमय बिल किंवा ड्राफ्ट वर केलेला विशिष्ट पृष्ठांकन आहे, ज्यामुळे देणदार (आयात करणारा) द्वारा बिल च्या म्यच्युरिटी वर भरणा न केलेल्या परिस्थितित भरणा करण्याची हमी देतो.

**बँक गॅरंटी**

बँक गॅरंटी हे बँकेने त्यांच्या ग्राहकाच्या वतीने तृतीय पक्षाल गॅरंटी दस्तावेजावर एका ठराविक रक्कम देण्याचे दिलेले वचन आहे. जर ग्राहक विलेखात दिलेले ऑब्लिगेशन पूर्ण करु शकला नाही तर तेवढी रक्कम देण्याची जबाबदारी बँक घेईल.

**बँकिंग लोकपाल**

एक स्वतंत्रपणे वाद निवारण करणारी प्राधिकृत संस्था, जी रिझर्व्ह बँकेने व्यक्ति आणि छोट्या संस्थांना त्यांच्या बँकाशी होणा-या वादातून तोडगा काढण्यासाठी निर्माण केली आहे.

**बिल्स**

बिल्स हे वित्तीय निगोशिएबल इंस्ड्रुमेंट आहे. जसे बिल ऑफ एक्सचेंज किंवा प्रॉमिसरी नोट. बिल ऑफ एक्सचेंज विक्री करणा-याकडून खरेदीदाराला दिली जाते ज्यात त्याला पुरवठा केलेल्या मालाचा/दिलेल्या सेवेचा मोबदला देण्याची सूचना केलेली असते. प्रॉमिसरी नोट म्हणजे खरेदीदाराकडून विक्री करणा-याला मिळालेल्या मालाचा/सेवेचा मोबदला देण्याचे वचन दिलेले असते.

**बिल्स पर्चेस/डिस्काउंटिंग**

बिल्स पर्चेस/डिस्काउंटिंग ही ज्याने मागणी किंवा यूजन्स बिल ऑफ एक्सचेंज दिले आहे अशा मालाच्या विक्रेत्याला क्रेडिट देण्याची पद्धत आहे. डिमांड बिल खरेदी केले जाते आणि यूजन्स बिल डिस्काउंट केले जाते.

### कॅश क्रेडिट/ओव्हर ड्राफ्ट

कॅश क्रेडिट/ओव्हर ड्राफ्ट ही अशी क्रेडिट सुविधा आहे ज्यात कर्जदाराला आधीच एक मर्यादा ठरवून दिली जाते त्या मर्यादेत त्याच्या आवश्यकतेनुसार रक्कम तो काढू शकतो. जर त्याच्या खात्यात ऋण उपलब्ध असेल तर तो पुन्हा नव्याने रक्कम उचलू शकतो. अशा प्रकारे ही मर्यादा चक्राकार ऋण आहे. उरलेल्या रकमेवर बँक व्याज लावते.

### नुकसान भरपाईची नीती

नुकसान भरपाईची नीती म्हणजे बँकेने ग्राहकाला जर बँकेच्या ओमिशन किंवा कमिशन मुळे ग्राहकाचा वित्तीय तोटा झाला तर देण्याची नुकसान भरपाई.

### क्रेडिट सुविधा/बँक कर्ज

बँके द्वारे देण्यात येणा-या क्रेडिट सुविधा या मुदत कर्ज किंवा ओव्हरड्राफ्ट किंवा कॅश क्रेडिट या स्वरुपात ठराविक काळासाठी ग्राहकाला दिल्या जातात ज्यावर बँक व्याज लावते.

### क्रेडिट इनफर्मेशन कंपन्या (CICs)

क्रेडिट इनफर्मेशन कंपन्या, कंपनी अधिनियम 1956 नुसार नोदणीकृत कंपन्या असतात. ज्यांना रिझर्व्ह बँक नोदणीकरण प्रमाण पत्र देते. या कंपन्याना त्यांच्या सभासद असलेल्या कर्ज देणा-या संस्थांकडून क्रेडिट बद्दलची माहिती गोळा करण्याचा आणि विश्लेषण केल्यानंतर ही माहिती त्यांच्या सभासदांना व विशेष यूजर्सना देण्याचा अधिकार आहे.

### फॅक्टरिंग

येणा-या पैशाचे व्यवस्थापन करण्यासाठी असलेला आर्थिक विकल्प म्हणजे फॅक्टरिंग. हा विक्री क्रेडिटचे रुपांतर नगद रकमेत करतो.

### व्याजाचा स्थिर दर

स्थिर दराचा अर्थ असा आहे कि व्याजाचा दर कर्जाच्या पुर्ण कालावधित बदलत नाहीत.

**व्याजाचा अस्थिर दर**

अस्थिर दराचा अर्थ असा आहे कि व्याजाचा दर कर्जाच्या पुर्ण कालावधित स्थिर नाहीत आणि बॅकेच्या संधर्भ दरा बरोबर बदलत असतो.

**हमी**

व्यक्तिने दिलेले वचन

**लेटर ऑफ क्रेडिट**

लेटर ऑफ क्रेडिट बँकेने जारी केलेला दस्तावेज आहे जे सहसा बदलता न येणारे वचन आहे ज्यामुळे लेटर ऑफ क्रेडिट मध्ये नमूद केलेला दस्तावेज सादर केल्यावर लाभार्थीला प्रदान दिले जाते.

**सुक्ष्म आणि लघु व्यवसाय**

सुक्ष्म आणि लघु व्यवसाय असे व्यवसाय आहेत जे सेवा देण्यात किंवा उत्पादन आणि सेवा देण्यात गुंतलेले आहेत.

**सुक्ष्म व्यवसाय याची व्याख्या अशी आहे-**

असा व्यवसाय ज्याचे कोणत्याही उद्योगातील उत्पादन करण्यासाठी संयंत्र आणि मशीन मधील गुंतवणूक रु.25 लाखां पेक्षा जास्त नसेल

किंवा

सेवा देणारा असा व्यवसाय ज्याची साधनांमध्ये गुंतवणूक रु.10 लाखां पेक्षा जास्त किंवा 2 कोटी रुपया पेक्षा कमी असेल.

**नेटवर्थ**

नेटवर्थ म्हणजे भांडवल अधिक निर्बाध आरक्षित निधी वजा संचित हानि (**Capital + free reserves-accumulated losses).**

## गैर-निधि आधारित सुविधा

गैर-निधि आधारित सुविधा ही बँकेने दिलेली अशी सुविधा आहे, जेव्हा ग्राहक ही सुविधा घेतो तेव्हा बँकेतून निधी बाहेर जात नाही परंतु जर ग्राहक ही सुविधा घेताना दिलेले वचन पूर्ण करण्यास अपयशी ठरला तर तेवढे दायित्व नंतरच्या तारखेला निचित (क्रिस्टलाइज) केले जाईल. गैर-निधि आधारित सुविधा सहसा बँक गॅरंटी, एक्सेपटन्स आणि लेटर ऑफ क्रेडिट च्या स्वरुपात दिली जाते.

## गैर निष्पादित परिसंपत्ति (NPA)

गैर निष्पादित परिसंपत्ति असे कर्ज किंवा अग्रिम,

**i)** मुदत कर्जामध्ये व्याज किंवा मुद्दलाचा हप्ता 90 दिवसापेक्षा जास्त काळपर्यंत भरलेला नसेल

**ii)** ओव्हरड्राफ्ट/कॅश क्रेडिटच्या संदर्भात खाते आउट ऑफ ऑर्डर झाले

**iii)** बिल पर्चेस किंवा डिस्काउंटच्या संदर्भात बिल 90 दिवसापेक्षा जास्त काळ ओव्हरड्यू झाले

## `आउट ऑफ ऑर्डर' स्थिति

मंजूर केलेल्या रकमेपेक्षा/पैसे काढण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त रक्कम सतत अदत्त बाकी रहाणे म्हणजे `आउट ऑफ ऑर्डर' स्थिति. जेव्हा खात्यामध्ये अदत्त बाकी मंजूर मर्यादा/पैसे काढण्याच्या क्षमतेपेक्षा कमी असेल, परंतु तुलन पत्राच्या तारखेपर्यंत सतत 90 दिवस काही रक्कम जमा नसेल किंवा तेवढ्या काळा दरम्यानचे व्याज वजा करण्यासाठी काही जमा नसेल, तेव्हा असे खाते आउट ऑफ आर्डर धरले जाते.

## ओव्हरड्यू

कोणतीही रक्कम कोणत्याही कर्ज सुविधेखाली बँकेला देय असेल तथापि बँकेने निश्चित केलेल्या तारखेला दिली गेली नाही तर ती रक्कम ओव्हरड्यू ठरते.

## पेमेंट व सेटलमेंट सिस्टीम

ही एक वित्तीय पद्धति आहे. पुरवठादार व निधीचा वापर करणारा यांच्यामध्ये पैशाचे आदानप्रदान करण्यासाठी वापरण्यात येणारी पद्धति आहे. ही पद्धति वित्तीय संस्थांद्वारे क्रेडिट व डेबिट करुन वापरली जाते.

## पिन (PIN) वैयक्तिक ओळख क्रमांक

हा गोपनीय क्रमांक असून कार्डासह हा क्रमांक वापरुन ग्राहक वस्तू/सेवांचा मोबदला देऊ शकतो, पैसे काढू शकतो आणि बँकेने देऊ केलेल्या इतर इलेक्ट्रॉनिक सेवांचा वापर करु शकतो.

## तर्कसंगत

योग्य कारण आणि विचाराने नियंत्रणाने काम करणे जे व्यवहाराच्या मर्यादेत असेल, अत्यधिक नसेल.

## संदर्भ दर

हा बँकेचा बेंचमार्क व्याज दर असतो ज्याच्याशी अस्थिर व्याजदर वर मंजुर कर्जाचा संबंध असतो. संदर्भ व्याज दर हा प्रत्येक बँकेचा धोरणानुसार ठरवलेला/संशोधन केलेला असतो.

## रिपझेशन (परत घेणे)

रिपझेशन (परत घेणे) म्हणजे अशी पद्धत जेव्हा कर्जदाराने करारनाम्यातील अटी पाळून कर्जेचे हप्ते फेडले नाहीत तर बँक ज्या घर किंवा वस्तू (जसे गाडी) चा ताबा घेते.

## पुनर्वसन कार्यक्रम

पुनर्वसन कार्यक्रम हा आजारी घटकांसाठी तयार केलेला असतो. रिझर्व्ह बँकेच्या निदेशाप्रमाणे तो तयार केलेला असतो व सहसा त्यात खालील गोष्टींचा समावेश असतो.

i) विनियामक निदेशानुसार शिथिल केलेल्या व्याजदरासहित खेळते भांडवल

ii) व्याजाचे निधी दिलेले मुदत कर्ज

iii) खेळते भांडवल मुदत कर्ज

iv) मुदत कर्ज

v) आकस्मिक कर्ज सहाय्य

**सुरक्षा**

कर्ज किंवा उत्तरदायित्वाला तारण म्हणून ठेवलेली मालमत्ता. कर्जदार कर्ज फेडण्यास कुचराई करत असेल तेव्हा कर्ज देणारी बँक या मालमत्तेवर दावा करु शकते.

कर्जदाराला दिलेल्या कर्ज सुविधेमधून तयार केलेली मालमत्ता म्हणजे प्राथमिक सुरक्षा आणि किंवा जी व्यवसायाशी/प्रकल्पाशी परस्पर संबधित आहे, ज्यासाठी कर्ज दिले आहे. कर्जासाठी ठेवलेले कोणतेही तारण म्हणजे संपार्श्विक सुरक्षा उदा. दागिने, घर गहाण ठेवणे इ.

**सेवा**

**i)** सुक्ष्म आणि लघु सेवा उद्योग, यांच्या सेवा म्हणजे लहान रस्ते आणि पाणी वाहतूकदार, लहान व्यावसायिक, व्यावसायिक आणि स्वरोजगार असलेल्या व्यक्ति आणि इतर सर्व सेवा उद्योग

**ii)** बँकेद्वारे दिल्या जाणा-या सेवा जसे विविध सुविधा जसे विप्रेषण (डीडी, एमटी, टीटी इ. जारी करणे), नगद स्वीकारणे व प्रदान करणे, नोटा व परदेशी चलन बदलून देणे इ.

**आजारी घटक**

आजारी घटक म्हणजे अशी संस्था जी सहा महिन्यापेक्षा जास्त काळ सबस्टँडर्ड राहिली आहे किंवा तोटा जमत राहिल्यामुळे नेटवर्थ पूर्ण संपले आहे ज्यापैकी 50**%** मागील आर्थिक वर्षात संपले आहे आणि संस्था मागील दोन वर्षापासून व्यावसायिक उत्पादन करीत आहे.

**टेरिफ शेड्युल**

बँक आपल्या ग्राहकांना त्यांच्या उत्पादने व सेवांसाठी जे शुल्क/आकार लावते त्याची माहिती शेड्युलमध्ये दिलेली असते.

लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम 2006 ह्या संहितेला **भारतीय बँकिंग संहिता आणि मानक मंडला** द्वारा भारतीय रिझर्व बैंक, भारतीय बँक संघ आणि सदस्य बँकाच्या सहकार्याने तयार केला गेला आहे. ह्या संहितेचा प्रमुख उद्देश्य असा आहे कि एक चांगली आणि निष्पक्ष बँकिंग पद्धतिच्या प्रचार, कमाल मानक तयार करने, पारदर्शकता वाढवणे, मोठ्या संचालन मानक ला मिळवणे आणि ह्याव्यतिरिक्त बँकर-ग्राहकाचे चांगले संबंध स्थापित करने आहे ज्यामुळे सामान्य माणसांचा बँकिंग पद्धती वर विश्वास वाढु शकेल. **BCSBI** ची स्थापना फेब्रुवरी 2006 ला एक स्वतंत्र संस्थेच्या रूपात केली गेली आणि त्याचा उद्देश्य बँकाद्वारे सुविधा पुरवितांना बँकिंग संहिता आणि नियमांचे योग्य प्रकारे पालन होत आहे याची पाळत ठेवने आणि निश्चिती करण्याचे काम आहे. **BCSBI** ने दोन प्रकारचे कोड बनविले आहेत – **व्यक्तीगत गाहकांकरिता बँकेची बंधने ची संहिता आणि सुक्ष्म आणि लघु उद्योगा करिता बँकेची बंधने ची संहिता**. ह्या संहितांना **BCSBI** च्या सदस्य बँकेद्वारा स्वीकार केला गेला आहे ज्यात अनुसूचित वाणिज्यिक बँक, अर्बन कोऑपरेटीव बँक आणि प्रादेशशिक ग्रामीण बँक मिळलेले आहेत. **BCSBI** ही आपल्यासाठी व्यवस्था आणि अधिदेश तक्रार निवारण फोरम नाही आहे. तरीसुध्दा **BCSBI** बँकाची धोरणे, कामकाजची पद्धतीमध्ये वाद (जर काही असेल तर) संबंधित कमतरतेला शोधण्यासाठी तक्रारीवर कार्य करतात आणि त्यांना दूर करण्यासाठी कार्यवाही करतात.

**BCSBI** च्या संबंधित आणखी माहिती साठी कृपया **www.bcsbi.org.in** वेबसाइट पहा.